e जलसेवा

# अधीक्षक अभियंता,

जलसंपदा ई-प्रशासन मंडळ,
१० वा मजला, नविन प्रशासकिय इमारत,
मंत्रालय मुंबई-३२
दुरध्वनी: ०२२-२२०२५२५७
ई-मेल: sewregc.wrd@maharashtra.gov.in

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग

*जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळास कृपया भेट द्या: https://wrd.maharashtra.gov.in*

(फक्त ई-मेल द्वारे) जा.क्र.: ई.प्र.मं./२०१६/(५/१६) दिनांक:- ०९/०६/२०१७

प्रति,

मा. महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक
मा. महासंचालक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद.
मा. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे व विकास महामंडळ, पुणे.
मा. कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा सिंचन विकास महामंडळ, औरंगाबाद.
मा. कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपुर.
मा. कार्यकारी संचालक, कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे.
मा. कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव.
मा. सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग
मा. सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग

**विषय:-** **ई-सेवा पुस्तक प्रणाली मधील "Posting Details" व " Probation and Confirmation Details" ही दोन मोडयुल्स माहिती भरण्याकरिता उपलब्ध करून देणे बाबत....**

**संदर्भ:-**
१) जलसंपदा विभाग शासन निर्णय - प्रशा/ २०१४/(२५१/१४)/ल.पा.-१ दि. ११.११.२०१४
२) जलसंपदा विभाग, प.क्र. ई-प्रशा/ २०१४(२५१/१४)/ल.पा.-१ दि. २५.०३.२०१५
३) अधीक्षक अभियंता,कोयना संकल्पचित्र मंडळ या कार्यालयाचे प.क्र. पीएमओ /D-४/धा- १५४ /१४५२ /२०१५ / दि. ३१.०७.२०१५
४) कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणिकरण विभाग, पुणे या कार्यालयाचे पत्र प्रसंवि/तां-१/ईसेपु/०७/फाईल क्र.१५४/२०१६ दि. १०/०५/२०१६

उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये जलसंपदा विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे करिता ई-सेवा पुस्तक ही प्रणाली अनिवार्य करण्यात आली आहे. संदर्भ पत्र क्र. २, ३ व ४ अन्वये ई-जलसेवा पुस्तक प्रणाली मधील पहिले नऊ मोडयुल्स माहिती भरण्याकरिता उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. विभागतील अधिकारी/ कर्मचारी यांनी सदर नऊ मोडयुल्स मध्ये त्यांची वैयक्तिक माहिती चांगल्या प्रकारे भरलेली आहे. आता ई-सेवा पुस्तक प्रणाली मधील "Posting Details" व "Probation & Confirmation Details" हे महत्वाचे दोन मोडयुल्स माहिती भरण्याकरिता उपलब्ध करून देण्यात येत आहेत. जलसंपदा विभागांतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांच्या सेवाकाळातील नियुक्ती, बदली, पदोन्नती, प्रतीनियुक्ती इत्यादी बाबतची माहिती Posting Details या मोडयुल मध्ये भरावयाची आहे. "Probation & Confirmation Details" या मोडयुल

मध्ये परिवीक्षाधीन कालावधी व स्थायीत्वाबाबत माहिती भरावयची आहे. या मोडयुल्स मध्ये माहिती कशी भरावी याबातचे "User Manual" सोबत जोडण्यात येत आहेत तसेच ते जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळावरील "ई-सेवा पुस्तक" या टॅब अंतर्गत ही उपलब्ध आहेत. कार्यकारी अभियंता, संगणक प्रशासनिकरण विभाग, पुणे या कार्यालयामार्फत उपरोक्त दोन्ही मोडयुल्स मध्ये माहिती कशी भरावी याबाबत सर्व कार्यालयांतील ई-सेवा पुस्तक समन्वयकांना "Video Conference" द्वारे सविस्तर प्रशिक्षण देण्यात येईल.

सदर मोडयुल्स मधिल माहितीचा शासन व परिमंडळ यांना वेळोवेळी लागणाऱ्या माहितीमध्ये समावेश असल्याने त्यांमधील माहिती अत्यंत अचुक व तत्परतेने दिनांक ३० जून २०१७ पुर्वी भरण्याबाबत आपल्या अधिनस्त कार्यरत सर्व अधिकारी/कर्मचारी यांना निंदेशीत करावे ही विनंती.

हे आपल्या महितीसाठी व आवश्यक कार्यावहीसाठी सविनय सादर.

सहपत्र: वरीलप्रमाणे

श्रीमती पुर्णिता देसाई
अधीक्षक अभियंता,
जलसंपदा विभाग, ई-प्रशासन मंडळ,
मंत्रालय , मुंबई

टीप:-" Posting Details" व " Probation & Confirmation Details" या दोन मोडयुल्स मध्ये माहिती कशी भरावी या बाबतचे " User Manual" जलसंपदा विभागाच्या संकेत स्थळावरील **ई-सेवा पुस्तक** या वेब पेज वरती उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

प्रतिलिपी:-

प्रत:- सचिव (ज.सं.व्य.व ला.क्षे.वि.), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई (लक्षवेध:- डॉ. संजय बेलसरे, उपसचिव, (नि.व.स). व श्री अतुल कोदे, सहसचिव (सेवा) ) यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत:- मा. मुख्य अभियंता, (जसं), जलसंपदा विभाग, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत: - सर्व कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी.